लोकमत

# शिवाजी विद्यापीठ जगात अग्रेसर व्हावे

## एन. जे. पवार : गडहिंग्लजमध्ये 'रवळनाथ-ज्ञानदीप'तर्फे कुलगुरूंचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : छत्रपती शिवाजी महाराज हे महापराक्रमी योद्धे होते. नावातच ऊर्जा असणाऱ्या योद्धयाचे नाव लाभलेले शिवाजी विद्यापीठ जगातील पहिल्या ५० विद्यापीठांच्या यादीत यावे आणि जगभरात अग्रसेर ठरावे, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. जे. पवार यांनी व्यक्त केली. गडहिंग्लज येथे श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे सभासद, नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या सत्कारप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिर्के म्हणाले, रवळनाथच्या सत्काराने विद्यापीठाच्या विकासाला बळ मिळाले आहे. पाटील म्हणाले, चौगुले यांची दूरदृष्टी व गुणग्राहकता यामुळेच 'रवळनाथ'ची चौफेर प्रगती




**गडहिंग्लज येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डी. टी. शिर्के यांचा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु एन. जे. पवार यांच्याहस्ते सत्कार झाला. यावेळी प्र. कुलगुरु पी. एस. पाटील, एम. एल. चौगुले, आनंदराव पाटील, मीना रिंगणे उपस्थित होते.**

झाली आहे.

यावेळी बालवैज्ञानिक अथर्व कदम याच्यासह 'ज्ञानदीप'चे देणगीदार विजय आरबोळे, सोनाबाई पाटील, अनंत मायदेव, काशीबाई चौगुले, उमा तोरगल्ली, विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, एस. एन. देसाई, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरू वालीकर यांचाही सत्कार झाला.कार्यक्रमास डी. आर. मोरे, एच. व्ही. देशपांडे, जे. बी. बारदेस्कर, ए. एम. गुरव, दत्ता पाटील, मंगलकुमार पाटील, एस. डी. कदम, सुरेश चव्हाण, अशोक सादळे, डी. के. मायदेव उपस्थित होते.संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक, तर मीना रिंगणे यांनी स्वागत केले.

संताजी आणि धनाजी

कोल्हापूरचे भूमिपुत्र असणारे शिर्के व पाटील हे बौद्धिक क्षेत्रातील संताजी व धनाजी आहेत. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठाच्या नावलौकिकात नक्कीच भर पडेल, असा विश्वास कुलगुरू पवार यांनी व्यक्त केला.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ जगात अग्रेसर ठरावे

## डॉ. एन. जे. पवार; ‘रवळनाथ-ज्ञानदीप’तर्फे कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १४ : छत्रपती शिवाजी महाराज महापराक्रमी योद्धे होते. नावातच ऊर्जा असणारे शिवाजी विद्यापीठ देशातील पहिल्या दहा विद्यापीठात आहे. ते जगातील पहिल्या ५० विद्यापीठांच्या यादीत येऊन जगात अग्रेसर ठरावे, अशी अपेक्षा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी व्यक्त केली.




**गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे झालेल्या कार्यक्रमात डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना डॉ. एन. जे. पवार. शेजारी एम. एल. चौगुले, डॉ. डी. टी. शिर्के, आनंदराव पाटील, मीना रिंगणे.**

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून डॉ. पवार बोलत होते. भारतीय विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. लायन्स ब्लड बँकेच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.डॉ. पाटील म्हणाले, “दूरदृष्टी, गुणग्राहकता, सामाजिक बांधिलकी यामुळे रवळनाथची चौफेर प्रगती झाली आहे.” प्रा. विजय आरबोळे, अथर्व कदम यांचीही भाषणे झाली. बालवैज्ञानिक अर्थव कदम याच्यासह ज्ञानप्रबोधिनीचे देणगीदार प्रा. विजय आरबोळे, सोनाबाई पाटील, अनंत मायदेव, काशिबाई चौगुले, उमा तोरगल्ली, विजय घुगरे, रेखा पोतदार, एस. एन. देसाई, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरु वालीकर यांचा सत्कार झाला.

झेप अकॅडमीच्या प्राचार्या मीना रिंगणे यांनी स्वागत केले. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एच. व्ही. देशपांडे, जे. बी. बारदेस्कर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दत्ता पाटील, डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. एस. डी. कदम, डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. अशोक सादळे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड आदी उपस्थित होते. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संचालक प्रा. विजय घुगरे यांनी आभार मानले.

> **शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता जागतिक पातळीवर नेण्यासाठी प्रयत्नशील आहे. मानांकनात संशोधनाला महत्त्व असल्याने त्यावरच भर दिला जाईल. रवळनाथचे कार्य आर्थिक क्षेत्राबरोबरच बौद्धिक क्षेत्रातही उल्लेखनीय आहे.**
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत सोमवार दि. १५ फेब्रुवारी २०२१

# ‘रवळनाथ’चे आर्थिकसह बौद्धिक क्षेत्रातही योगदान

## कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांचे प्रतिपादन : रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे प्रतिभावंतांचा गौरव : सहकाराची उंची वाढविली

प्रतिनिधी
गडहिंग्लज

गडहिंग्लजसह सीमाभागातील ग्रामीण भागात रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने प्रत्येक गरजूंना आर्थिक पाठबळ देत सहकार क्षेत्रात यापूर्वीच गुणवत्ता सिद्ध केली आहे. संस्थेने आर्थिक घटकासोबत अराजकीय, सामाजिक क्षेत्रातील वंचितांना शिक्षणाची गोडी निर्माण करत नव्या पिढीला दिशा देण्याचे काम करत असून मार्गदर्शन केंद्राचे कार्य कौतुकास्पद आहे. फक्त एकाच घटकाशी न राहता संस्थेच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक क्षेत्रातसुध्दा चांगले योगदान असल्याचे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी केले.




**गडहिंग्लज : येथे गौरव सोहळ्यात बोलताना कुलगुरु डॉ. एन. जे. पवार. व्यासपीठावर अध्यक्ष एम. एल. चौगुले, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, आनंदराव पाटील, डॉ. पी. एस. पाटील, मीना रिंगणे आदी.**

रवळनाथ को-ऑप सोसायटीच्या वतीने रविवारी सकाळी शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिभावंतांच्या गौरव सोहळ्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व रोपास पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात केली. स्वागत मीना रिंगणे यांनी केले.

प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, ग्रामीण भागात अतिशय संघर्षमय प्रवासातून संस्थेचे कार्य सुरू केल्यानंतर आज सहकार क्षेत्रात भरीव काम केले आहे. आर्थिक आणि सामाजिक घडी बसवताना प्रत्येक घटकाचा विकास हाच हेतू समोर ठेवून शैक्षणिक क्षेत्रात काम सुरू केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहराबरोबर आपल्या बौद्धिक पातळीवरही ओळख निर्माण केली पाहिजे म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यापासून काम सुरू केल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते रवळनाथ संस्थेचे सभासद असलेले आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तर संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते कुलगुरु डॉ. एन. जे. पवार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. पवार म्हणाले, गौरवशाली व्यक्तीच्या नावाने ज्या शिवाजी विद्यापीठाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर नेले आहे अशा विद्यापीठाचे कुलगुरू आणि सिनेट सदस्य होणे हाच समाजाकडून सन्मान मिळाला म्हणावे लागेल. रवळनाथ संस्थेच्या सरसेनापतीकडून येथील भूमिपुत्राचा गौरव होणे हे मोठे भाग्य आहे. संघटन, कौशल्य, नियोजन आणि हितसंबंधाच्या जोरावर रवळनाथ संस्थेची शिदोरी तयार झाली आहे. प्रत्येक नेतृत्वाला काम करत असताना चांगली संधी देणे ही देखील कर्तृत्वान आणि ध्येयवेडे व्यक्तीच असू शकतात, असे सांगत शिवाजी विद्यापीठाच्या कार्याचा गौरव केला.

गौरवमूर्ती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कुलगुरू पद स्वीकारल्यानंतर रवळनाथ संस्थेकडून पहिलाच सत्कार स्वीकारला आहे. व्यक्तीच्या गुणवत्तेवर त्याच्या पाउलखुणा दिसत असल्याने श्री. चौगुले यांनी आपली ताकद फक्त आर्थिक क्षेत्रात न खर्च करता सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातसुध्दा त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. गुणवत्तेचे केंद्रबिंदू म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या कक्षा रूंदावत असताना रवळनाथ सारख्या संस्थेकडून शिक्षणात होणारे कार्य हे खरच कौतुकास्पद असल्याचे सांगत सहकाराची उंची वाढविण्याचे काम सुरू असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. विजय आरबोळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात ज्ञानदीप प्रबोधिनीला मदत करणाऱ्या अभय खोत, डॉ. वसंत पेडणेकर, बरकतअली पासा, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरू वालीकर, सोनाबाई पाटील, वासुदेव मायदेव, काशिबाई चौगुले, उमा तोरगल्ली, प्रा. विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, प्राचार्य शंकर देसाई या देणगीदारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते केला. बालवैज्ञानिक अथर्व कदम याचा सत्कार कुलगुरू डॉ. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन किरण पाटील यांनी केले. आभार प्रा. विजयकुमार घुगरे यांनी मानले. यावेळी प्राचार्य डी. आर. मोरे, डॉ. एच. व्ही. देशपांडे, डॉ. ए. एन. गुरव यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

### बौद्धिक क्षेत्रातील संताजी, धनाजी जाधव यांचा सत्कार

कुलगुरू डॉ. पवार आपल्या भाषणात म्हणाले, या मातीत स्वराज्यासाठी एकनिष्ठ राहून पराक्रम करणारे सरसेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्याप्रमाणे शिक्षण क्षेत्रात काम करणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे कार्य संताजी आणि धनाजी सारखे असल्याचे सांगत त्यांना रवळनाथतर्फे योग्य तो सन्मान दिला असल्याचे प्रतिपादन केले.